# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०४/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १२ किमी. तारसा चौक येथे दिनांक ०३/०२/२०२२ चे ०१/०० वा. ते ०८/००वा. दरम्यान फिर्यादी नामे– जितेंद्र सुर्यभान वाहने, वय ४२ वर्ष रा. सालेबडी, ता. मोहाड जि. भंडारा ह.मु. जयताळा, नागपूर व फिर्यादीचा मित्र नामे– **देविदास संतोष बनकर(मृतक), वय ५० वर्षे रा. जयताळा, नागपूर** हा तारसा येथे हळदीचा कार्यक्रम करिता आले होते हळदिचा कार्यक्रम संपल्यावर रात्री ०१:०० वा फिर्यादी व मृतक हे सोबत झोपले. यानंतर फिर्यादी सकाळी ०८:०० वा उठले असता देविदास बनकर हा दिसला नाही. तेव्हा फिर्यादी त्याला शोधत चौकात गेला असता तेथे लोकांची गर्दी दिसली. तेव्हा फिर्यादीने तेथे जाउन पाहीले तर त्यांचा मित्र मृतक हा नालीमध्ये पडलेला दिसला. त्यांना लोंकाचे मदतीने बाहेर काढले. तरी फिर्यादीचा मित्र हा तोल गेल्याने नालीत पडला असावा व नालीतून बाहेर न निघता आल्याने व नालीत पाणी वाहत असल्याने तो मरण पावला असावा असे फिर्यादीने सांगितले वरून सदरचा मर्ग नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार संजय देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा रिंगणाबोडी येथे दिनांक ०३/०२/२०२२ चे २०.०० वा. पुर्वी **सारंग रमेश मेश्राम (मृतक), वय २२ वर्ष, रा रिंगणाबोडी** याने दारू निवुन दारूच्या नशेत उमक यांच्या शेतात असलेल्या मोर्चिच्या लाकडाला दोरीने बांधुन गळफास घेवुन स्वताहा आत्महत्या केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– उत्त्म चंपतराव भोयर वय ६० वर्ष रा. रिंगणाबोंडी त. काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार बाबुलाल राठोड मो नं ७७९८३४४९१९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर